सकाळ

# डॉ. राकेश जोशी यांना युवा वैज्ञानिक पुरस्कार

**पुणे, ता. १७ :** किटकांच्या प्रादुर्भावामुळे दरवर्षी शेतकऱ्यांचे कोट्यावधींचे नुकसान होते. तसेच कीटकनाशक नाका तोंडात गेल्यामुळे शेतकऱ्यांना जीवही गमवावा लागतो. यावर उपाय म्हणून फक्त कीटकांनाच लागू पडतील अशी रसायने शोधण्याचा प्रयत्न राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील जैवरसायन शास्त्रज्ञ डॉ. राकेश जोशी करत आहे. या योगदानाबद्दल त्यांना वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्यावतीने (सीएसआयआर) 'युवा वैज्ञानिक : २०२१' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुळचे नाशिकचे असलेले डॉ. जोशी यांनी केटीएचएम जैवतंत्रज्ञान विषयात पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षण पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयात घेतले. त्यानंतर 'एनसीएल'मध्ये पीएचडी केली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील जैवमाहिती आणि जैवतंत्रज्ञान विभागात (आयबीबी) ते पाच वर्षे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.

डॉ. जोशी म्हणले, "मागच्या दहा वर्षात राज्यात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आपण या विषयाकडे मुळाशी जाऊन कधीच पाहिले नाही. युवा पिढीला एकीकडे शेती, तर करायची नसते आणि त्यातील संशोधनातील कल सुद्धा कमी असतो. यावर एक प्रयत्न म्हणून, माझ्या संशोधनाच्या माध्यमातून फक्त किटकांवरच प्रभावी ठरणाऱ्या औषधांचा मी शोध घेत आहे."

देशातील ३५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या आणि संशोधनात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वैज्ञानिकांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. यंदा सात युवा वैज्ञानिकांना गौरविण्यात आले.



**देशाच्या गरजेनुसार संशोधन करण्याची नितांत गरज आहे. परिस्तिथीसापेक्ष आणि प्रगल्भ संशोधन देशाला नक्कीच सुजलाम् सुफलाम् बनवील.**
– **डॉ. राकेश जोशी**, वैज्ञानिक, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे